स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३—२४/४०८ दि. १०/१०/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : १३ ऑक्टोबर हा दिवस आपत्ती निवारण दिवस म्हणून साजरा करणेबाबत

महोदय,

मा. जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांच्या पत्रानुसार दि. १३ ऑक्टोबर २०२३ हा दिवस आपत्ती निवारण म्हणून साजरा करण्यात यावा, असे निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात दि. १३ ते २० ऑक्टोबर २०२३ दरम्यान आपत्ती निवारण विषयक उपक्रम घेवून व रंगीत तालिम राबवुन साजरा करण्यात यावा. आपत्ती निवारण विषयक महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, कार्यशाळा, पथनाटय, जनजागृती कार्यक्रम, सराव प्रशिक्षणे इत्यादी स्वरूपाच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा. जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांचे पत्र

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- controlroompune@gmail.com

**जावक क्र. आव्यप्रा/** 425 /2023 **दिनांक :**

0 6 OCT 2023

**प्रति,**

**आपदा मित्र,**

**पुणे**

**विषय :- 13 ऑक्टोबर हा दिवस आपत्ती निवारण दिवस म्हणून साजरा करणेबाबत..**

संदर्भ:- या कार्यालया कडील परिपत्रक क्र.: आव्यप्रा/419/2023 दि. 04/10/2023

उपरोक्त विषयान्वये, 13 ऑक्टोंबर हा दिवस "संयुक्त राष्ट्रांनी घोषित केल्यानुसार प्रतिवर्षी जागतिक आपत्ती धोके निवारण दिवस म्हणुन साजरा केला जातो. जगभर हा दिवस आपत्ती धोके निवारणाविषयी जनजागृती करुन व यासंबंधी निरनिराळे उपक्रम राबवून साजरा केला जातो.

त्यानुषंगाने 13 ऑक्टोबर 2023 ते 20 ऑक्टोबर 2023 या कालावधीत माध्यमिक शाळा, महाविद्यालय, आश्रम शाळा गाव, वाड्या, वस्त्या इत्यादी ठिकाणी पुर, आग, दरड कोसळणे, वीज कोसळणे, सर्पदंश, रस्ते अपघात, साथीचे रोग, नैसर्गिक किंवा मानव निर्मित आपत्तीच्या अनुषंगाने प्रशिक्षण, कार्यशाळा, पथनाटय, जनजागृती असे उपक्रम जिल्ह्यात विविध स्तरावर आयोजित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ नुसार या कार्यालयास सादर करावा किंवा controlroompune@gmail.com या मेल वर पाठविण्यात यावे.

सोबत- परिपत्रक जोडले आहे.

6/10

(विठ्ठल बनोटे)

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी,**

**पुणे.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- controlroompune@gmail.com

**जावक क्र. आव्यप्रा/419/2023** **दिनांक : 04/10/2023**

**विषय - 13 ऑक्टोबर हा दिवस आपत्ती निवारण दिवस म्हणून साजरा करणेबाबत.**

**परिपत्रक,**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सर्व राज्यांना हा दिवस राज्यांमध्ये निरनिराळे आपत्ती निवारण विषयक उपक्रम घेवून व रंगीत तालिम (Mock Dill) राबवुन साजरा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा. अवर सचिव, महसुल व वन विभाग(आपत्ती व्यवस्थापन प्रभाग) यांचे कडील परिपत्रक क्र. आव्यप्र 2017/प्र. क्र.207/आव्यप्र-1 दि. 08/09/2017अन्वये आपत्ती दिनाचे औचित्य साधून दिनांक 13 ऑक्टोबर 2023 ते 20 ऑक्टोबर 2023 या कालावधीत जिल्ह्यात खालील विविध स्तरावर आपत्ती धोके निवारण कार्यक्रम राबवावेत.

**१. महानगरपालिका पुणे/पिंपरी-चिंचवड** - (आपत्ती व्यवस्थापन विभाग व अग्निशमन दल )

महानगरपालिकेच्या क्षेत्रातील आपत्ती प्रवण भागात रंगीत तालीम आयोजित करावी. शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा पथनाटय, आपत्ती व्यवस्थापन प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे. औद्योगिक वसाहत, शासकीय इमारतीत, पुरप्रवण क्षेत्रात दरड प्रवण क्षेत्र, शाळा व महाविद्यालयांमध्ये सदर कालावधीत रंगीत तालीम आयोजित करावी.

**२. पोलिस आयुक्त पुणे / पिंपरीचिंचवड, पोलिस अधिक्षक पुणे ग्रामीण** -

आपल्या कार्यक्षेत्रातील आपत्ती प्रवण भागात रंगीत तालीम आयोजित करावी, शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा पथनाटय आपत्ती व्यवस्थापन प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे. औद्योगिक वसाहत, शासकीय इमारतीत पुरप्रवण क्षेत्रात, दरड प्रवण क्षेत्र शाळा व महाविद्यालयांमध्ये सदर कालावधीत रंगीत तालीम आयोजित करावी.

**३. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे** -

आपल्याकडील आपत्ती प्रवण क्षेत्रात सदर कालावधीमध्ये प्रशिक्षण, रंगीत तालीम व शोध व बचाव प्रशिक्षण घेऊन जनजागृती करण्यात यावी. तसेच, आपआपल्या विभागातील संबंधित आपत्तीबाबत प्रशिक्षण व रंगीत तालीम इ. घेण्यात यावे. राष्ट्रीय व राज्य महामार्गांच्या वाहतूक व सुरक्षा नियमावलीबाबत जनजागृती करण्यात यावी.

**४. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग (विभाग १,२ व ३ )** —

सदर कालावधीमध्ये आपल्या क्षेत्रातील आपत्ती प्रवण औद्योगिक क्षेत्रात रंगीत तालीम आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आपत्ती व्यवस्थापन साहित्याचे प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादीद्वारे जनजागृती करावी. ज्या भागात धोकादायक कंपन्या आहेत त्या गावात, क्षेत्रात जनसमुदायास आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देऊन जनजागृती करावी. विशेष करुन अतिसंवेदनशील कंपन्यामध्ये वेगवेगळ्या विभागांमार्फत उपरोक्त कार्यक्रम राबविण्यात यावेत.

**५. महाराष्ट्र नॅचरल गॅस, पुणे-**

आपल्या अधिनस्त असणा-या गैस पाईपलाईन दरम्यान रंगीत तालीम करण्यात यावी व आपल्या लाभार्थ्यांना आपल्याशी संबंधित होणा-या आपत्ती बाबत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण व जनजागृती करण्यात यावे.

**६. सर्व पेट्रोलियम कंपन्याचे मेन स्टेशन/सब स्टेशन/पाईपलाईन** -

आपल्या क्षेत्रातील आपत्ती प्रवण भागात रंगीत तालीम. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्याचे प्रदर्शन, चर्चासत्र आयोजित करुन जनजागृती करण्यात यावी. पेट्रोलियम पाईपलाईन दरम्यान ऑन साईड / ऑफ साईड रंगीत तालीम घेण्यात यावी. तसेच ज्या गावांमधून पेट्रोलियम पाइपलाइन गेलेली आहे, त्या गावांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण व रंगीत तालीम सदर कालावधीमध्ये आयोजित करावी.

**७. आकाशवाणी केंद्र पुणे, पुणे विद्यापीठ आकाशवाणी आणि सर्व FM रेडीओ चॅनल -**

१३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये आपत्ती व्यवस्थापन संदर्भात तज्ञ व्यक्तींचे/ आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचे चर्चा सत्र, आपत्ती विषयी जनजागृती करण्यात यावी.

**८. NDRF पुणे, नागरी संरक्षण दल, अग्निशमन दल, होमगार्ड –**

आपल्या कार्य क्षेत्रातील आपत्ती प्रवण भागात रंगीत तालीम आयोजित करावी, शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा पथनाटय आपत्ती व्यवस्थापन प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे. औद्योगिक वसाहत, शासकीय इमारतीत, पुरप्रवण क्षेत्रात, दरड प्रवण क्षेत्र शाळा व महाविद्यालयांमध्ये सदर कालावधीत रंगीत तालीम आयोजित करावी.

**९. केंद्रिय औदयोगिक सुरक्षा बल, हिंजवडी -**

केंद्रिय औदयोगिक सुरक्षा बलामार्फत इन्फोसिस कंपनीच्या सुरक्षततेच्या दृष्टीकोनातून रंगीत तालीम, आपत्ती विषयी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात यावेत.

**१०. सर्व तहसिलदार/मुख्याधिकारी न.प. -**

आपल्या कार्य क्षेत्रात किंवा आपत्ती प्रवण भागात रंगीत तालीम आयोजित करावी, शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, कार्यशाळा, पथनाटय, जनजागृती कार्यक्रम, सराव प्रशिक्षणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**११. आपदा मित्र/तालुका स्तरीय आपत्ती व्यवस्थापन पथक/सामाजिक सेवाभावी संस्था –**

आपत्ती प्रवण भागात रंगीत तालीम आयोजित करावी, शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, कार्यशाळा, पथनाटय, जनजागृती कार्यक्रम, सराव प्रशिक्षणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे.

वरील सर्व विभागांनी 13 ऑक्टोबर 2023 ते 20 ऑक्टोबर 2023 या कालावधीत **पुर, आग, दरड कोसळणे, वीज कोसळणे, सर्पदंश, रस्ते अपघात, साथीचे रोग, नैसर्गिक किंवा मानव निर्मित आपत्तीच्या अनुषंगाने** रंगीत तालीम (मॉक ड्रिल), प्रशिक्षणे/कार्यशाळा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाटय, जनजागृती असे उपक्रम जिल्ह्यात विविध स्तरावर आयोजित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(डॉ. राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे**

**प्रति,**

1. मा. आयुक्त, महानगरपालिका पुणे/पिंपरी चिंचवड
2. पोलिस आयुक्त पुणे / पिंपरीचिंचवड, पोलिस अधिक्षक पुणे ग्रामीण
3. कमांडन्ट, एन.डि.आर.एफ. सदुंबरे ता. मावळ, जि. पुणे,
4. प्रादेशिक परीवहन अधिकारी, पुणे
5. अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग (विभाग १,२ व ३ ) पुणे
6. सर्व तहसिलदार,
7. व्यवस्थापक, महाराष्ट्र नॅचरल गॅस पुणे
8. व्यवस्थापक, हिंदूस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रालियम, रिलायन्स पेट्रोलियम व सर्व कंपन्याचे पेट्रोलियम पाईपलाईन
9. व्यवस्थापक, आकाशवाणी केंद्र पुणे, पुणे विद्यापीठ आकाशवाणी सर्व एफ एम रेडीओ चॅनल
10. व्यवस्थापक, केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल, इन्फोटेक पार्क,.इन्फोसिस फेज-२ हिंजवडी
11. मुख्य अग्निशमन अधिकारी- PMRDA, पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा.
12. उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल, पुणे
13. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषद
14. आपदा मित्र पुणे.